मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# जयंतीदिनी शिवरायांना महापालिकेचे अभिवादन!

## हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज हे कुशल राजनीतिज्ञ : आयुक्त शेखर सिंह

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज हे कुशल राजनीतिज्ञ, युध्दनितीनिपुण तर होतेच शिवाय ते सर्वांना समान वागणूक व न्याय देणारे जगातील आदर्श राजे होते, त्यांच्या महान कार्याचा, युध्दकौशल्याचा अभ्यास जगभरातील इतिहासाचे तज्ञ व अभ्यासक करतात याचा सार्थ अभिमान असल्याचे प्रतिपादन आयुक्त शेखर सिंह यांनी केले.



निगडी येथील भक्ती शक्ती चौक उद्यानातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादनाची सुरूवात करण्यात आली, त्यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतताना आयुक्त शेखर सिंह बोलत होते.

यावेळी माजी नगरसदस्य मारूती भापकर, सचिन चिखले,क्षेत्रीय अधिकारी शितल वाकडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता नितिन देशमुख, सामाजिक कार्यकर्ते जीवन बोराडे, सागर तापकीर आदी उपस्थित होते.

त्यानंतर अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी पिंपरी चिंचवड महापालिका मुख्य प्रशासकीय भवनातील प्रतिमेस तसेच शहरातील पिंपरी वाघेरे, रहाटणी चौक, एच.ए.कॉलनी पिंपरी, कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी, लांडेवाडी चौक भोसरी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.या कार्यक्रमास जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, एच.ए.कॉलनी येथील कार्यक्रमास माजी नगरसदस्या सुलक्षणा धर, कार्यकारी अभियंता सतीश वाघमारे, तर दापोडी व फुगेवाडी येथील कार्यक्रमांस माजी नगरसदस्य संजय काटे,स्वाती उर्फ माई काटे तसेच सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

तर अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी थेरगाव गावठाण, डांगे चौक थेरगाव आणि प्रेमलोक पार्क चिंचवड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले,यावेळी क्षेत्रीय अधिकारी किशोर ननावरे,कार्यकारी अभियंता बाळू लांडे, मुख्य लिपिक देवेंद्र मोरे,लिपिक मंगेश इंगळे तसेच सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

उप आयुक्त राजेश आगळे यांनी भोसरी येथील पीएमटी चौक, मोशी, चऱ्होली येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी क्षेत्रीय अधिकारी नाना मोरे,मुख्य लिपिक किसन केंगले,अभिजित डोळस उपस्थित होते.

अ प्रभाग क्षेत्रीय अधिकारी शितल वाकडे यांनी मोहननगर चिंचवड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले यावेळी माजी नगरसदस्य मारूती भापकर तसेच सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाणी पुरवठा बंदचा बनावट 'एसएमएस' तुमचा खिसा करेल रिकामा

## मेसेज मधील फाईल ओपन करू नका : टोल फ्री क्रमांक 1903 वर संपर्क साधण्याचे पोलिसांचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड मनपा पाणी पुरवठा विभाग यांच्या नावाने पाणी पुरवठा बंद करण्यात येत असल्याचे बनावट एसएमएस पाठवण्याचे प्रकार शहरामध्ये घडत आहेत. नागरिकांनी अशा बनावट एसएमएसकडे दुर्लक्ष करावे. तसेच बनावट एसएमएस पाठवणाऱ्या क्रमांकाची तक्रार सायबर पोलिसांकडे करावी, असे आवाहन पिंपरी चिंचवड मनपा आणि पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे. मेसेज मधील एपीके फाईल आणि दिलेल्या नंबरवर फोन न करण्याचा सल्ला पोलिसांनी दिला आहे.

पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रात सध्या ज्या मालमत्तेची पाणीपट्टी थकीत आहे, अशा मालमत्तेचे नळकनेक्शन तोडण्याची कारवाई सुरू आहे. याशिवाय थकीत पाणीपट्टी भरण्याचे आवाहन मनपाच्या माध्यमातून 'एसएमएस' द्वारे व इतर माध्यमातून करण्यात येत असते. परंतु सध्या मनपाच्या पाणी पुरवठा विभागाच्या नावाने विविध मोबाईल क्रमांकावरून बनावट एसएमएस पाठवण्याचे प्रकार सुरू आहेत. अशा एसएमएसकडे दुर्लक्ष करण्याचे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.



### पालिका पाणी पुरवठा विभागाकडे संपर्क साधा

- पाणीपुरवठा बंद होण्याबाबत येणारे मेसेज बनावट आहेत का, याची खात्री करा
- मोबाईलवर आलेली एपीके फाईल ओपन करू नये. तसेच इतरांना शेअर करू नये
- पाणीपुरवठ्याच्या प्रलंबित बिलाबाबत मनपाच्या संकेतस्थळावर माहिती घ्या.

पिंपरी चिंचवड मनपाच्या पाणी पुरवठा विभागाच्या नावाने प्राप्त होणाऱ्या बनावट एसएमएस बाबत तक्रार करण्यासाठी नागरिक तात्काळ जवळचे पोलीस ठाणे, सायबर पोलीस ठाणे अथवा टोल फ्री क्रमांक १९०३ यावर संपर्क करू शकतात.

**बँक खात्यातून पैसे काढून नागरिकांची फसवणूक**

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना पाठवण्यात येणारे बनावट एसएमएस देवेश जोशी या नावाने आहेत. या एसएमएसमध्ये नमुद करण्यात आले आहे की, 'प्रिय ग्राहक मागील महिन्यातील बिल न भरल्यामुळे रात्री ९ वाजता पाणी पुरवठा बंद करण्यात येणार आहे. कृपया याबाबत तात्काळ खालील नंबरवर कॉल करा.' याशिवाय, व्हॉट्सअपद्वारे पाठवण्यात येणाऱ्या एसएमएसमध्ये एक एपीके फाईल पाठवली जात आहे. ही एपीके फाईल डाऊनलोड केल्यानंतर मोबाईल फोनमधील डेटा, बँक खात्याची माहिती, पासवर्ड अशा स्वरुपाच्या माहिती मिळवून बँक खात्यातून पैसे काढून नागरिकांची फसवणूक केल्याचे प्रकार घडत आहेत. अशा आशयाचा कोणताही एसएमएस मनपाकडून पाठवण्यात येत नसल्याने नागरिकांनी घाबरून न जाता तात्काळ असा एसएमएस येताच तक्रार करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# किल्ल्यावरील सर्व अतिक्रमणे काढणार : मुख्यमंत्री

## राज्य शासनाच्यावतीने किल्ले संवर्धनाचे काम सातत्याने सुरु : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे | प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित किल्ले हे आमच्याकरीता मंदिरापेक्षाही मोठे असून त्यांचे जतन आणि संवर्धनाचे काम राज्य शासनाच्यावतीने सातत्याने सुरु आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.



किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे, बापूसाहेब पठारे, माजी आमदार अतुल बेनके, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य आशाताई बुचके, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते.

शिवजन्मोत्सवाच्यानिमित्त नागरिकांना शुभेच्छा देवून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे योद्धे असण्यासोबतच उत्तम प्रशासक होते. विविध व्यवस्थापनाचे गुरु होते, शिवरायांनी आपले संपूर्ण आयुष्य जनतेच्या कामी लावले म्हणून आदर्श राजा, जाणता राजा, श्रीमंत योगी म्हणून आपण त्यांचे स्मरण करतो.

स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड येथे विविध विकास कामे सुरु आहेत. त्याचप्रमाणे शिवनेरीचाही विकास करण्यात येत आहे. छत्रपती शिवरायांच्या किल्ल्यांवरील अतिक्रमण काढण्याचा निर्णय घेण्यात आला असून कसल्याही प्रकारची अतिक्रमणे राहणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्यातील १२ गड किल्ले नामांकनासाठी निवडले आहेत. हे गडकिल्ले स्थापत्यशास्त्र, जलसंवर्धन, पर्यावरणशास्त्राचे उत्तम नमुना असून याबाबत पॅरिस येथील होणाऱ्या महासभेत येत्या आठवड्यात सादरीकरण करण्यात येणार आहे. हे गड किल्ले जागतिक वारसास्थळे होतील आणि जगातील लोक ते बघण्याकरीता येतील, अशा विश्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.

### किल्ल्याच्या संवर्धनासाठी निधी कमी पडून देणार नाही : उपमुख्यमंत्री अजित पवार

**» छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकोट, किल्ले खऱ्याअर्थाने त्यांची दौलत आहे, ते आपले शक्तीस्थान, स्फूर्तीस्थान असून त्यांचे जतन, संवर्धन करणे ही राज्य शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे राज्यशासनाच्यावतीने किल्ले शिवनेरी, रायगड, प्रतापगड, सिंहगड, पुरंदर आदी किल्ले परिसरात विविध विकासकामे करीत आहेत, किल्ल्याच्या संवर्धनासाठी निधी कमी पडून देणार नाही, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.**

मुगल साम्राज्यात विविध राजे, राजवाडे मांडलिकत्व पत्कारत असताना मराठी मुलखात अनाचार, अत्याचार सुरु होते. माँ जिजाऊनी छत्रपती शिवाजी महाराजांना याविरुद्ध प्रतिकार करुन स्वराज्याकडे नेण्याची जबाबदारी दिली. छत्रपती महाराजांनी अठरा पगड जातीच्या लोकांना एकत्र करुन मावळ्यांची फौज तयार केली; यामाध्यमातून देव, देश आणि धर्माची लढाई सुरु करुन स्वराज्य स्थापनेतून खऱ्याअर्थाने भारताचा आत्मभिमान जागृत केला. आजच्या १४० कोटी लोकसंख्येच्या आत्मभिमानी भारताच्या मागे छत्रपती शिवरायांची प्रेरणा असून ते आमचे आराध्य दैवत आहेत.

येत्या ५ वर्षांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा ४०० वा शिवजन्मोत्सव साजरा करणार आहोत. किल्ले शिवनेरीवर आल्यानंतर येथील मातीतून स्वराज्याची स्फूर्ती, तेज मिळते. यातून प्रेरणा घेऊन राज्याची सेवा करण्याकरीता आम्ही येथे येतो. राज्यशासनामार्फत शिवनेरी परिसरातील विकासकामे पूर्ण करण्यासाठी आम्ही कार्यरत राहू असे श्री. फडणवीस म्हणाले.

# लोणीकाळभोर, सासवडपर्यंत मेट्रोचे जाळे विस्तारणार

## हडपसर ते लोणीकाळभोर आणि हडपसर ते सासवड या दोन मार्गावर धावणार मेट्रो

**पुणे | प्रतिनिधी**

शहराच्या पूर्व भागातील वाहतूक समस्या गंभीर होत असून, याठिकाणी आता मेट्रोचा पर्याय समोर आला आहे. हडपसर ते लोणीकाळभोर आणि हडपसर ते सासवड या दोन मार्गावर मेट्रो धावणार आहे. त्यासाठीच्या प्रस्तावास पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने व मुख्यसभेने मान्यता दिली आहे. या प्रकल्पासाठी ५ हजार ७०४ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. तर पुणे महापालिकेला भूसंपादनासाठी केवळ ३.६० कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.



पुणे शहरासह उपनगरे, ग्रामीण भागात पायाभूत सुविधांसह सार्वजनिक वाहतूक मजबूत करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि महामेट्रोतर्फे पुणे महापालिकेची हद्द आणि पीएमआरडीएच्या हद्दीसाठी सर्वंकष वाहतूक विकास आराखडा तयार केला आहे. या आराखड्यानुसार पुणे शहराचा भविष्यात होणारा विस्तार आणि विकास लक्षात घेऊन नवीन मेट्रो मार्गाचा विस्तार आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

पुणे एकिकृत महानगर परिवहन प्राधिकरण (पुम्टा) च्या बैठकीत हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर ते सासवड रेल्वे स्थानक या दोन मेट्रो मार्गिकाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार हा प्रकल्प अहवाल तयार केला आहे. या अहवालास महापालिकेच्या मुख्यसभेने मान्यता दिली आहे.

### असा असेल मेट्रो प्रकल्प

**» हडपसर ते लोणी काळभोर या मेट्रो मार्गाचे अंतर ११.५ किलोमीटर आहे. या दरम्यान १० मेट्रो स्टेशन उभारण्यात येतील. त्यातील ६ स्टेशन महापालिका हद्दीमध्ये असतील तर ४ स्टेशन हे ग्रामीण हद्दीत आहेत. हडपसर ते सासवड हा मार्ग ५.५७ किलोमीटरचा असणार असून या दरम्यानचे २ मेट्रो स्टेशन महापालिका हद्दीमध्ये असणार आहेत. या प्रकल्पासाठी केंद्र व राज्य सरकारडून प्रत्येकी २० टक्के निधी देणार आहे. ६० टक्के निधी 60 टक्के कर्जाच्या माध्यमातून उभारण्यात येणार आहे, असे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितले.**

केंद्र व राज्य शासनाने हा प्रस्ताव मंजूर केल्यानंतर पुणे महापालिका महामेट्रोसोबत करारनामा करून भूसंपादनासाठी ३ कोटी ६० लाख रुपये देणार आहे. या दोन्ही विस्तारित मार्गासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून निधी दिला जाईल व उर्वरित निधी कर्जाच्या स्वरूपात उपलब्ध होणार आहे. त्याचे कोणतेही दायित्व महापालिकेवर येणार नाही असे या प्रस्तावात नमूद केले आहे.

# तंत्रज्ञानामुळे विविध प्रकल्प नागरिकांच्या सेवेत

## आगामी 50 वर्षे डोळ्यासमोर ठेवून शहराचा सर्वांगीण विकास होण्यासाठी विविध प्रकल्पांची उभारणी करण्यात येत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. २०५४ पर्यंत पुणे शहरापेक्षा पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या अधिक होणार आहे. त्या अनुषंगाने आगामी ५० वर्षे डोळ्यासमोर ठेवून शहराचा सर्वांगीण विकास होण्यासाठी विविध प्रकल्पांची उभारणी करण्यात येत आहे. त्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विविध प्रकल्प आणि प्रशासकीय इमारतींची उभारणी करण्यावर भर देण्यात येत आहे.

यामध्ये पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीच्या वतीने जीआयएस एनेबल्ड ईआरपी अंतर्गत कोअर ॲप्लिकेशन (सॅप), नॉन कोअरॲप्लिकेशन,ई-ऑफिस (डीएमएस) आणि भौगोलिक माहिती प्रणालीत (जीआयएस) विकसित केलेली संगणक प्रणाली प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. तसेच चिंचवडमधील तालेरा रुग्णालयाची नवीन इमारत, शहरातील विविध ठिकाणी टाकाऊपासून टिकाऊ (वेस्ट टू वंडर) वस्तूंपासून निर्मिती केलेल्या टिकाऊ कलाकृती, सिटी हब फॉर डेटा कम्युनिकेशन असे विविध प्रकल्प नागरिकांच्या सेवेत दाखल झाले आहेत. या प्रकल्पामुळे नागरिकांना सोयी-सुविधा देण्यास निश्चित मदत होणार आहे.



### टाकाऊपासून टिकाऊ कलाकृती

» निरूपयोगी, भंगार, नादुरुस्त साहित्यांचा वापर करून टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ कलाकृतींची निर्मिती महापालिकेच्या वतीने करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत विविध उद्यानांमध्ये तसेच पिंपळे गुरव येथील राजमाता जिजाऊ येथे १५ लहान मोठ्या आकाराच्या डायनोसॉरच्या प्रतिकृती उभारण्यात आल्या आहेत. शहराच्या पर्यटनाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार असून यासाठी ८ कोटी १ लाख रुपये इतका खर्च करण्यात आला आहे.

### ई-प्रशासन संगणक प्रणाली

» पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडने भारत सरकारच्या स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत ३३ संगणक प्रणाली विकसित करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणातील माहितीचे व्यवस्थापन करण्यास तसेच विविध प्रक्रिया स्वयंचलित होण्यास मदत मिळणार आहे. या प्रकल्पांतर्गत महापालिकेच्या १००० पेक्षा अधिक प्रक्रिया गतिमान होणार आहेत. यामुळे महापालिका अधिकारी कर्मचा-यांना तसेच नागरिकांना अधिक दर्जेदार व जलद सेवा प्रदान करण्यात मदत होणार आहे. ई-ऑफिस या संकल्पनेचा कामकाजात समावेश करून कागदविरहत कार्यालयीन कामकाजाला प्रोत्साहन देणे, प्रशासकीय कामकाज सुलभ करणे आणि विभागांमध्ये योग्य समन्वय साधून कामकाजात अधिक सुसूत्रता आणणे हा यामागचा उद्देश आहे. शिवाय यामुळे ऑनलाईन दस्तावेज हाताळण्याच्या प्रक्रियेतील गती, अचूकता, पारदर्शकता आणि सुरक्षादेखील वाढणार आहे. याबाबत सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणदेखील देण्यात आले आहे. या उपक्रमासाठी ११२ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे.

**सिटी हब फॉर डेटा कम्युनिकेशन**

महानगरपालिकेच्या विविध सेवा नागरिकांपर्यंत अधिक प्रभावी पद्धतीने पुरवण्यासाठी महापालिकेने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. या सेवा प्रदान करत असताना नागरिकांचे प्रोफाईल तयार करणे, डेटा मिळविणे या अनुषंगाने शहरातील नागरिकांचा परिपूर्ण डेटा संकलित करून त्यानुसार महापालिकेची ध्येयधोरणे ठरवून त्याची अंमलबजावणी अधिक सक्षमपणे करणे गरजेचे आहे. त्यासाठी सिटी हब फॉर डेटा कम्युनिकेशन हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमाचे प्राथमिक उद्दिष्ट महापालिकेच्या विविध विभागांमध्ये डेटा-चलित निर्णय क्षमता वाढविणे, विविध विभागामार्फत देण्यात येणाऱ्या ऑनलाईन सेवा आणि त्यातून प्राप्त होणाऱ्या माहितींचे एकत्रीकरण करून त्या दृष्टीने आवश्यक कार्यप्रणाली तयार करण्यात येत आहे. महापालिकेच्या उत्पन्न वाढीसह नागरिकांच्या विविध तक्रारींचे निराकरण सुयोग्य पद्धतीने करता यावे यासाठी ही प्रणाली महत्त्वाची ठरणार आहे. शिवाय या प्रणालीमुळे विविध विभागांकडील माहितीचा अंतर समन्वय करणे, यामुळे सोपे होणार असून प्राप्त माहितीचे विश्लेषण करून त्यातून विविध धोरणे आखणे, संवाद माध्यमे कार्यान्वित करणे, विविध निर्णयांची अंमलबजावणी करणे सोयीचे होणार आहे. या प्रकल्पासाठी २० कोटी १२ लाख इतका खर्च करण्यात येत आहे.

चिंचवडचे तालेरा रुग्णालय रुग्णाच्या सेवेत शहरातील वैद्यकीय सुविधा अधिक सक्षम करणे, नागरिकांना अल्प दरात दर्जेदार वैद्यकीय सुविधा उपलब्ध देणे, याकरिता चिंचवड येथे ६० कोटी ६० लाख रुपये खर्च करून नव्याने १५८ खाटांचे सुसज्ज मल्टीस्पेशालिटी तालेरा रुग्णालय उभारण्यात आले आहे. या ५ मजली इमारतीच्या पहिल्या मजल्यावर ओपीडी, मेडिकल दुसऱ्या मजल्यावर ऑपरेशन थिएटर, एनआयसीयू, लहान मुलांचा वॉर्ड असणार आहे,

# आता शुल्क भरा, अन् फेरीवाला प्रमाणपत्र, ओळखपत्र घ्या

## पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील फेरीवाले व विक्रेत्यांचे सर्वेक्षण केले, पंधरा हजारांपैकी केवळ 8 हजार फेरीवाल्यांनी भरले शुल्क

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील फेरीवाले व व्रिकेत्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यात १५ हजार १३ फेरीवाले पात्र ठरले आहेत. त्यापैकी आतापर्यंत केवळ ८ हजार फेरीवाल्यांनी १ हजार ४०० रुपये शुल्क संबंधित क्षेत्रीय कार्यालयात जमा केले आहेत. त्यांना लवकरच प्रमाणपत्र व ओळखपत्राचे वाटप केले जाणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील फेरीवाले व व्रिकेत्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यात १५ हजार १३ फेरीवाले पात्र ठरले आहेत. त्यापैकी आतापर्यंत केवळ ८ हजार फेरीवाल्यांनी १ हजार ४०० रुपये शुल्क संबंधित क्षेत्रीय कार्यालयात जमा केले आहेत. त्यांना लवकरच प्रमाणपत्र व ओळखपत्राचे वाटप केले जाणार आहे.



उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेने फेरीवाला कायद्यानुसार १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत शहरातील फेरीवाले व विक्रेत्यांचे सर्वेक्षण केले. त्यात एकूण १८ हजार ६०३ फेरीवाल्यांची नोंदणी झाली. छाननी तसेच, सुनावणीत कागदपत्रांची पूर्तता न केल्याने काही अर्ज बाद करण्यात आले. शहरातील एकूण १५ हजार १३ फेरीवाले पात्र ठरले आहेत. आतापर्यंत केवळ ८ हजार फेरीवाल्यांनी १ हजार ४०० रुपये शुल्क संबंधित क्षेत्रीय कार्यालयात जमा केले आहेत. त्यांना लवकरच प्रमाणपत्र व ओळखपत्राचे वाटप केले जाणार आहे.

महापालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयांनी नोंदणीसाठी १ हजार रुपये शुल्क आणि ओळखपत्र व प्रमाणपत्रासाठी प्रत्येकी २०० रुपये शुल्क, असे एकूण १ हजार ४०० रुपये शुल्क घेतले जात आहे. त्यास ऑक्टोबर २०२४ पासून सुरुवात करण्यात आली आहे. आतापर्यंत एकूण ८ हजार फेरीवाल्यांनी हे शुल्क जमा केले आहे. शुल्क जमा केलेल्या फेरीवाल्यांना लवकरच प्रमाणपत्र व ओळखपत्र वाटप केले जाणार आहे, ती प्रकिया लवकरच सुरू करण्यात येणार आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### क्षेत्रीय कार्यालयाकडून प्रमाणपत्र वाटप

» एक हजार ४०० रुपये शुल्क भरण्यास ३१ मार्च २०२५ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. शुल्क भरणाऱ्यांना ओळखपत्र व प्रमाणपत्र दिले जाणार आहे. ती प्रकिया लवकरच सुरू करण्यात येणार आहे, असे भूमी आणि जिंदगी विभागाचे साहाय्यक आयुक्त मुकेश कोळप यांनी सांगितले.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबल्याने उमेदवारांची घालमेल

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तीन वर्षांसनू रखडल्या आहेत, न्यायालयाच्या आदेशानंतर कोणत्याही क्षणी या निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तीन वर्षांसनू रखडल्या आहेत. न्यायालयाच्या आदेशानंतर कोणत्याही क्षणी या निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. विधानसभेचे मिनी सभागृह म्हणून जिल्हा परिषदेकडे पाहिले जाते; मात्र गेल्या तीन ते चार वर्षापासून न्यायालयात असलेल्या प्रलंबित याचिकेमुळे जिल्हा परिषदेच्या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. पुणे जिल्ह्यात गटांची संख्या 7 ने तर गणांची संख्या 14 ने वाढणार असल्याने सध्या अस्तित्वात असलेल्या गट-गण रचनेत मोठे फेरबदल होणार की पूर्वीचेच गट गण राहणार.? ही इच्छुकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. जुन्या मतदारसंघात तयारी केलेली इच्छुक आता या चर्चेमुळे धास्तावले आहेत.



न्यायालयाच्या आदेशानंतर कोणत्याही क्षणी या निवडणुकाची घोषणा होण्याची शक्यता आहे; परंतु निवडणुकांची अनिश्चितता असल्याने भावीउमेदवारांची घालमेल सुरू असून पक्षाकडून उमेदवारी मिळण्याच्या आशेने गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेल्या मेहनतीवर (खर्चावर) पाणी फिरण्याची वेळ आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये जिल्हा परिषदेला अधिक महत्त्व आहे. मिनी मंत्रालय म्हणून ओळख असलेल्या जिल्हा परिषदेच्या सभागृहात जाण्यासाठी अनेकांची इच्छा असते. विधानसभेत जाण्यासाठी ही प्रमुख महत्त्वाची पायरी समजली जाते. त्या अनुषंगाने इंदापूर तालुक्यातील ग्रामीण भागात नेतृत्व करण्याची संधी याच जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतून निर्माण होते.

राज्याचे क्रीडा युवक कल्याण अल्पसंख्याक मंत्री दत्तात्रय भरणे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनीही आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात जिल्हा परिषदेपासून केली होती. सध्या निवडणूक खोळंबल्याने अनेकांचे राजकीय भवितव्य धोक्यात आले आहे. त्याला भरीत भर म्हणून जिल्हा परिषदेच्या मतदारसंघांची पुनर्रचना झाली तर किंवा नाही झाली तर कशी तयारी करायची, गट गण अद्यापही निश्चित नसल्याने उमेदवार मात्र संभ्रम अवस्थेत आहेत. चालू वर्षात निवडणूक होईल या आशेवर इंदापूर तालुक्यातील अनेक भागात सार्वजनिक कार्यक्रम घेतले जात होते. दुःखद घटनेत किंवा लग्नकार्यास उपस्थित राहण्याची चढाओढ पाहायला मिळत होती; परंतु तीन वर्ष होऊनही निवडणुका न झाल्याने भावी उमेदवारांनी खर्च आखडता घेतला असल्याचे दिसून येते.

इंदापूर तालुक्यातील काही ग्रामपंचायत, जिल्हा परिषद पंचायत समिती, नगरपरिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांवरती प्रशासक असल्याने इतना सन्नाटा क्यू है भाई, असं कार्यकर्त्यांमध्ये वातावरण आहे. दरम्यान इंदापूर तालुक्यात होणाऱ्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भारतीय जनता पक्ष स्वतंत्र लढवणार असल्याचे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सांगण्यात येत आहे.

### पक्षप्रवेशाचे सोहळे रंगणार

» संभाव्य पुनर्रचनेनुसार इंदापूर तालुक्यात दोन जिल्हा परिषद व चार पंचायत समिती गट गण वाढण्याची शक्यता आहे. तालुक्यात राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तर माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष यांच्या प्रमुख लढत होणार असल्याचे चित्र आहे. त्याचवेळी इंदापूरमध्ये अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवलेले प्रवीण माने काय भूमिका घेणार? हे पण महत्त्वाचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर इंदापूर तालुक्यात अनेक बदल घडणार असून पक्षप्रवेशाचे सोहळे रंगणार असल्याची चर्चा आहे.

### ग्रामीण भागातील विकासाला खीळ

» तीन वर्ष सभागृह अस्तित्वात नसल्याने ग्रामीण भागातील विकासाला खीळ बसली आहे. अनेकांनी लोकसभा विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून संपर्क दौरा सुरू ठेवला आहे. पण या निवडणुकीनंतर ही स्वराज्य संस्था निवडणुका न लागल्याने इच्छुकांच्या तोफा थंडावल्या आहेत. न्यायालयाचा निकाल स्पष्ट न झाल्याने निवडणुका लाबणीवर जाण्याची शक्यता आहे. अशातच मतदारसंघांची पुनर्रचना होण्याची हालचाली सुरू झाल्या आहेत. निवडणुका खोलांबल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना सरकारी योजनांचा विसर पडला आहे. त्यामुळे इच्छुकांची कसरत पाहायला मिळत आहे.

# वर्षाची नव्हे; पूर्ण टर्मची चौकशी करा : खासदार सुप्रिया सुळे

**मी स्वतः बीडला जाऊन मागणी करणार ; अशी ग्वाही बारामती लोकसभेच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली.**

**पुणे | प्रतिनिधी**

त्या मुलांचे वडील कधीही येणार नाहीत, त्यांचा खून झाला आहे. मुलगी, पत्नी न्याय मिळण्यासाठी वणवण फिरत आहेत. मुलीच्या, भावाच्या, बायकोच्या डोळ्यातील अश्रू हे राज्य सरकारला दिसत नाही. किती अस्वस्थ करणारी ही परिस्थिती आहे.खून झालेला पाचवा माणूस कुठे आहे. गायब फोनचे सीडीआर मिळू शकत नाहीत, असे कसे होऊ शकते.

शेतकऱ्यांची फसवणूक, डीपीडीसीच्या मीटिंगमध्ये एकच वर्षाची चौकशी करा, अशी मागणी आहे; मात्र मी स्वतः बीडला जाऊन मागणी करणार आहे पूर्ण टर्मची चौकशी करा .पूर्ण पाच वर्षाचा हिसाब किताब तपासणार अशी ग्वाही बारामती लोकसभेच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली.



इंदापूर येथे खासदार सुप्रिया सुळे यांनी शरद कृषी महोत्सवास भेट देऊन पाहणी केली. यावेळी पत्रकारांशी खासदार सुप्रिया सुळे बोलत होत्या. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे तालुका कार्याध्यक्ष महारुद्र पाटील, महिला तालुकाध्यक्ष छायाताई पडसळकर, अमोल भिसे, अमोल मुळे, यांच्यासह पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, मी कधीही इतके असंवेदनशील राज्य सरकार पाहिले नाही. नैतिकतेची भेट झाली नाही. सुरेश धस हा डायलॉग सर्व चॅनलवर बोलले आहेत. या सुरेश भाऊंकडून मला खूप अपेक्षा होत्या. राजकारण बाजूला ठेवून त्या मुलांसाठी, पोरांसाठी उभे होते. देशमुख कुटुंबाची काय चूक असे म्हणत बीड परभणी प्रकरणाची हळहळ खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांची फसवणूक, डीपीडीसीच्या मीटिंगमध्ये एकच वर्षाची चौकशी करा, अशी मागणी आहे; मात्र मी स्वतः बीडला जाऊन मागणी करणार आहे पूर्ण टर्मची चौकशी करा .पूर्ण पाच वर्षाचा हिसाब किताब तपासणार अशी ग्वाही बारामती लोकसभेच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली.

> जल जीवन मिशनचा बारामती लोकसभा मतदारसंघाचा पूर्णपणे संबंधित मंत्र्यांकडे श्वेत पत्रिका मागितली आहे. खासदार निलेश लंके यांनी पूर्ण राज्याची श्वेतपत्रिका मागितलेली आहे.जनतेने टॅक्स भरलेल्या रक्कम यातूनच हा निधी मिळतो. जल जीवन मिशनचे काम ग्राउंडवर चांगले कोठेही दिसत नाही. देशात 41 टक्के निधी या योजनेला खर्च झाला नाही. सी. आर. पाटील यांनी जलजीवन मिशनचा एकही पैसा वाया जाणार नाही, असा मला शब्द दिला आहे.
>
> - सुप्रिया सुळे, खासदार बारामती